आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

३१ ऑगस्ट २०२४ -शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- देशातले महिला सुरक्षेचे कायदे सक्रिय करण्याची आणि या प्रकरणांचा निकाल लवकर लावण्याची गरज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडून व्यक्त

- मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या निधी वितरणाच्या दुसऱ्या टप्प्याला आजपासून नागपूरात सुरुवात

- विधानसभा निवडणुकीसाठी राज्यात साडे ९ कोटींहून अधिक मतदार, विविध उपाययोजनांमुळं नवमतदारांच्या संख्येत महिनाभरात ११ लाखांहून अधिक वाढ

**आणि**

- पॅरिस पॅरालिम्पिक स्पर्धेत भारतीय खेळाडूंची आगेकूच कायम

**<><><><><>**

देशात महिलांच्या सुरक्षिततेसाठी अनेक कडक कायदे लागू केले आहेत. हे कायदे आणखी सक्रीय करायची गरज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज व्यक्त केली. अशा प्रकरणांचे निकाल जितक्या लवकर लागतील, तितकी आपण सुरक्षित असल्याची खात्री महिलांना पटेल, असंही प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. जिल्हास्तरीय न्यायपालिकेच्या दोन दिवसांच्या राष्ट्रीय परिषदेचं उद्घाटन त्यांनी आज केलं. त्यानंतर ते बोलत होते.

**होल्ड - प्रधानमंत्री बाइट**

सर्वोच्च न्यायालयाच्या स्थापनेला ७५ वर्षं पूर्ण झाल्याच्या निमित्तानं एक विशेष टपाल तिकीट आणि एका नाण्याचं प्रकाशनही मोदी यांच्या हस्ते झालं. सर्वोच्च न्यायालयाचा ७५ वर्षांचा प्रवास लोकशाहीची जननी म्हणून भारताची शान आणखी वाढवतो, असे गौरवोद्गार त्यांनी काढले. हा प्रवास भारताच्या राज्यघटनेचा

आणि राज्यघटनेनं दिलेल्या मूल्यांचा आहे, असं ते म्हणाले. सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांनीही जिल्हास्तरीय न्यायपालिका परिषदेला संबोधित केलं.

या परिषदेमुळे जिल्हास्तरीय न्यायपालिका आणि इतरांमध्ये संवादाला वाव मिळेल, असं मत त्यांनी मांडलं. केंद्रीय कायदा आणि न्याय मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी, ई-न्यायालय उपक्रमाच्या तिसऱ्या टप्प्यात अत्याधुनिक तंत्रज्ञानासाठी ७ हजार २०० कोटी रुपये निधी उपलब्ध करून दिल्याची माहिती दिली.

**<><><><><>**

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या निधी वितरणाच्या दुसऱ्या टप्प्याला आज नागपूर इथं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सुरूवात झाली. या योजनेच्या पहिल्या टप्प्यात एक कोटी साठ लाख महिलांच्या खात्यात योजनेचे पैसे जमा झाले असून १ हजार ५६२ कोटींहून अधिक रुपये वितरित झाल्याचं मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितलं. हे सरकार दिलेला शब्द पाळणारं सरकार असून ही योजना कधीही बंद होणार नाही अशी ग्वाही शिंदे यांनी दिली. या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी उपस्थित होते.

जोपर्यंत महिला मुख्य प्रवाहात येत नाहीत तोपर्यंत देशाचा विकास होऊ शकत नाही, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले. मुलींच्या शिक्षणाची चिंता करू नका त्यासाठी सर्वतोपरी मदत करायला सरकार वचनबद्ध आहे असं त्यांनी सांगितलं.

योजनेच्या पहिल्या टप्प्यात २५ लाख आणि त्यानंतरच्या टप्प्यात एक कोटी महिलांना आम्ही लखपती दिदी बनवणार आहोत, असं त्यांनी सांगितलं. या नोकऱ्या मागणाऱ्या नव्हे तर नोकऱ्या देणाऱ्या बहिणी असतील असं ते म्हणाले. महिलांच्या बाबतीत अपराध करणाऱ्याला आमचं सरकार जास्तीत जास्त सजा

देईल, असंही फडणवीस यांनी सांगितलं.

<><><><><>

तरुण पिढीनं आपली प्रतिभा, नवनिर्मिती आणि क्षमता, हवामान बदलाचा सामना करण्यासाठी वापरण्याची गरज आहे, असं प्रतिपादन केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव यांनी केलं आहे. मुंबईच्या भारतीय तंत्रज्ञान संस्थेत 'आयडियाज फॉर लाईफ' या मोहिमेसंबंधीच्या कार्यक्रमात आज ते बोलत होते. २०२१मध्ये ग्लासगो इथं झालेल्या संयुक्त राष्ट्र हवामान बदल परिषदेत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ही संकल्पना मांडली होती. जागतिक पातळीवर हवामान बदल रोखण्यासाठी या मोहिमेत समाविष्ट करण्यात आलेल्या ७ विषयांची माहिती यादव यांनी यावेळी दिली. तसंच या विषयांवर आधारित कल्पना Ideas4Life.nic.in या संकेतस्थळावर नोंदवण्याचं आवाहन केलं. यातल्या उत्तम कल्पनांना खास पारितोषिकंही दिली जाणार आहेत.

हवामान बदलाचा सामना करण्यासाठी कार्बन डायऑक्साईडचं उत्सर्जन रोखणं अतिशय महत्त्वाचं असून त्यासाठी प्रत्येकानं आपलं 'कार्बन फुटप्रिंट' मोजावं आणि त्याची नोंद ठेवावी, असं आवाहन आय आय टी मुंबईचे संचालक शिरीष केदारे यांनी या कार्यक्रमात केलं.

<><><><><>

द्राक्षापासून तयार होणाऱ्या बेदाण्याला कृषिमाल म्हणून मान्यता मिळण्यासाठी नाबार्डसह अन्य संबंधित यंत्रणांसोबत चर्चा करून सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली काल झालेल्या बैठकीत ठरलं. बेदाण्यावरचा पाच टक्के जीएसटी रद्द करण्यासाठी केंद्रीय जीएसटी परिषदेला पत्र लिहिण्यात येईल, द्राक्ष आणि फळबागांना प्लास्टिक आच्छादनासाठी अनुदान मिळावं यासाठी हॉर्टीकल्चर बोर्डाकडे मागणी करण्यात येईल, असे निर्णय या बैठकीत घेण्यात आले.

<><><><><>

कृषी उत्पादन वाढवण्यासाठी तरुणांनी नवीन तंत्रज्ञान शिकून घ्यायला हवं असं राज्याचे महसूल पशूसंवर्धन आणि दुग्धविकासमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी म्हटलं आहे. अहमदनगरमध्ये कृषी खात्याने आयोजित केलेल्या कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते झालं. सेंद्रीय पद्धतीने पिकवलेला कृषीमालाच्या विक्रीसाठी शिर्डीत विक्रीकेंद्र सुरु करता येईल असं ते म्हणाले. कृषी महाविद्यालये आणि संशोधन केंद्रांनी शेतकऱ्याच्या बांधापर्यंत कृषी तंत्रज्ञान पोचवायला हवं असं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी राज्यात साडे ९ कोटींहून अधिक मतदार आहेत. राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं काल अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली. त्यानुसार राज्यात ९ कोटी ५३ लाख ७४ हजार ३०२ मतदार आहेत. ६ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध केलेल्या प्रारुप यादीच्या तुलनेत राज्यात १६ लाख ९८ हजार ३६८ मतदारांची भर पडली आहे. यानंतरही विधानसभा निवडणुकीचे अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवसाच्या १० दिवस आधीपर्यंत मतदार यादीत नाव नोंदवून विधानसभा निवडणुकीसाठी मतदान करण्याची संधी यादीत नाव नसलेल्या मात्र पात्र मतदारांना आहे.

प्रारुप मतदार यादीत राज्यात ९ कोटी ३६ लाखांहून अधिक मतदार होते. २० लाखांहून अधिक दावे आणि पावणे ४ लाखांहून अधिक हरकतींनंतर त्यात १६ लाख ९८ हजार मतदारांची भर पडली. तसंच ऑगस्ट महिन्यात ४ वेळा मतदार नोंदणीसाठी मतदान केंद्रांवर विशेष शिबिरांचं आयोजन झालं. विविध संस्था, महाविद्यालयांनी मतदार यादीत नोंदणीसाठी शिबिरं आयोजित केल्यानं नवीन मतदारांच्या संख्येत ११ लाख २३ हजार ३३६ ची भर पडली. ७० वर्षांहून अधिक वय असलेले ५४ हजारांहून अधिक मतदार या यादीतून कमी झाले. अंतिम मतदार

यादीत ६ लाख २८ हजार ६३ दिव्यांग मतदार आहेत. विविध पातळीवर झालेल्या प्रयत्नांमुळं मतदार यादीतलं स्त्री-पुरुष गुणोत्तर ९२५ वरुन ९३३ पर्यंत वाढलं आहे. राज्यात आता ४ कोटी ९३ लाख ३३ हजार ९९६ पुरुष, ४ कोटी ६० लाख ३४ हजार ३६२ महिला आणि ५ हजार ९४४ तृतीयपंथीय आहेत.

**<><><><><>**

सोलापूर जिल्ह्यातील माढा विधानसभा मतदारसंघातले राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार बबन शिंदे यांनी आगामी निवडणुकीतून माघार घेतली आहे. आपल्या ऐवजी त्यांनी आपल्या मुलाला रणजित शिंदे यांना संधी देण्याची मागणी केली आहे.

**<><><><><>**

वनसफारीसाठी आता बॅटरीवर चालणाऱ्या गाड्या वापरल्या जात आहे. त्यामुळं प्रदुषण होत नसल्यानं या गाड्यांची संख्या तिप्पट करावी. यामुळं पर्यटकांची संख्या तसंच रोजगारही वाढेल, अशी सूचना केंद्रीय मंत्री नितिन गडकरी यांनी आज नागपूर इथं केली. पर्यटन विषयक परिषदेत ते बोलत होते. राज्याचे पर्यटन मंत्री गिरीश महाजन यांनी राज्याच्या पर्यटन धोरणाची माहिती दिली.

**<><><><><>**

राजस्थान मल्टीस्टेट बँकेचे संचालक अभिषेक बियाणी यांना पुणे इथून अटक करण्यात बीडच्या आर्थिक गुन्हे शाखेला यश आलं आहे. अनेक दिवसांपासून या प्रकरणातील आरोपी असलेलं बियाणी कुटुंबिय पोलिसांना गुंगारा देत होतं. अखेर आर्थिक गुन्हे शाखेनं ही कारवाई केली.

**<><><><><>**

पॅरिस पॅरालिम्पिक खेळांमध्ये महिलांच्या 10 मीटर एयर रायफल स्पर्धेत सुवर्ण पदक पटकावत भारताचं नाव पदक विजेत्या देशांच्या यादीत झळकावल्याबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी नेमबाज अवनी लेखरा हिचं अभिनंदन केलं आहे.

पुरुषांच्या 10 मीटर एयर पिस्तुल स्पर्धेत रौप्य पदक पटकावणाऱ्या मनीष नरवाल, महिलांच्या 10 मीटर एयर रायफल स्पर्धेत कांस्य पदक पटकावणाऱ्या मोना अग्रवाल तसंच महिलांच्या 100 मीटर स्पर्धेत कांस्य पदक जिंकणाऱ्या प्रिती पालचंही त्यांनी अभिनंदन केलं आहे.

बॅडमिंटनमध्ये भारताच्या सुकांत कदम आणि सुहास यतिराज यांनी आपापल्या एकेरीच्या गटात विजय मिळवत उपांत्य फेरीत प्रवेश केल्यानं भारताचं या खेळात किमान एक पदक निश्चित झालं आहे.

महिलांच्या 10 मीटर एयर पिस्तूल स्पर्धेत भारताची नेमबाज रुबिना फ्रान्सिसनं आज चांगली कामगिरी करत अंतिम फेरीत प्रवेश केला आहे.

मात्र, भारताच्या स्वरूप उन्हाळकर याला पुरुषांच्या १० मिटर एअर रायफल स्पर्धेत 14 व्या स्थानावर समाधान मानावं लागल्याने अंतिम फेरीत प्रवेश करण्यात अपयश आलं.

**<><><><><>**

येत्या 24 तासात कोकण, मराठवाडा आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. विदर्भात तुरळक ठिकाणी जोरदार ते अती जोरदार पावसाची शक्यता आहे असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**//<><><><><>//**